फौ. प्र. संहिता (१९७४ चे अधिनियम २) चे प्रकरण २१ अन्वये संक्षिप्त संपरीक्षा केलेल्या खटल्याचा अभिलेख

नागपुर येथील न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय क्रं. ३, नागपुर यांच्या न्यायालयात

समरी फौजदारी खटला क्रमांक १४९५६/२०२४

निशाणी क्रमांक –

| | | |
|---|---|---|
| १) | गुन्हा घडल्याची तारीख | २९/०५/२०२४ |
| २) | फिर्याद दाखल केल्याची तारीख | २९/०५/२०२४ |
| ३) | फिर्यादीचे नाव, वय, पत्ता इ. चा तपशिल | विशाल भैसारे<br>पोहवा., पो. ठाणे कळमना, नागपूर शहर. |
| ४) | आरोपीचे नाव, वय, पत्ता इ. चा तपशिल | १. प्रकाश नंदु साहु, वय ३२ वर्षे<br>रा. विजय नगर, नागपूर<br>२. थनवार दुरसिंग सिन्हा, वय ६० वर्षे<br>रा. विजय नगर, नागपूर<br>३. देसी गोविंद साहु, वय ५४ वर्षे<br>रा. विजय नगर, नागपूर<br>४. बल्लुराम रामजी निर्मलकर, वय ५२ वर्षे<br>रा. विजय नगर, नागपूर<br>५. सोनु सुरेश साहु, वय ३२ वर्षे<br>रा. विजय नगर, नागपूर<br>६. चंद्रेश रंजीत वर्मा, वय २७ वर्षे<br>रा. विजय नगर, नागपूर. |

५) दोषारोपातील गुन्हयाचा तपशिल जो आरोपीस वाचुन स्पष्ट करुन सांगण्यात आला तो याप्रमाणे

दिनांक २९/०५/२०२४ रोजी १५.१५ वाजेच्या सुमारास, नागपुर शहरातील ख्ल्ला नं. ०२ मधिल दुकान क्र. १९, चबुतयावर मोकळया जागेत सार्वजनिक ठिकाणी तुम्ही आरोपीनी स्वतःच्या फायदयासाठी ५२ पत्त्याचा पैशाची बाजी लावून हार जितचा जुगार खेळतांना व खेळवितांना जुगाराची साधने व रोख रुपयांसह मिळुन आलात, म्हणुन तुम्ही महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ प्रमाणे गुन्हा केल्याचे तोहमत आहे व सदरचा गुन्हया या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात आहे.

६) आरोपीचे प्रतिकथन -

प्रश्न क्रमांक १) पोलिसांनी केलेल्या तपासकामातील कागदपत्राच्या प्रती मिळाल्या काय ?

उत्तर होय.

प्रश्न क्रमांक २) दोषारोपपत्रातील गुन्हयाचा तपशिल जो आता तुम्हास वाचुन व स्पष्ट करुन सांगण्यात आला तो तुम्हांस समजला काय ?

उत्तर होय.

प्रश्न क्रमांक ३) सदरचा गुन्हा तुम्हांस कबुल आहे का ?

उत्तर होय, आम्हाला गुन्हा कबुल आहे.

समक्ष,

१.------------------------

२.-------------------------

३.-------------------------

४.------------------------

५. --------------------------

६.----------------------------

(आरोपीची सही /अंगठा)

स्वा./-
( निलेश बी.पाटील )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
न्यायालय क्रं. ३, नागपुर

# न्यायनिर्णय

(आज दिनांक १२/०३/२०२६ )

आरोपी क्रं. १ ते ६ यांना न्यायालयासमोर हजर केले असता, यांना सदरचा गुन्हा कबुल असल्याचे सांगितले. तसेच गुन्हा कबुल करतांना त्याच्याविरुध्द कुठल्याही प्रकारचा दबाब किंवा प्रलोभन नसल्याचेही सांगितले. म्हणुन आरोपीस त्याच्या विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोपाचा सारांश वाचुन समजावुन सांगितला असता त्यांनी गुन्हा कबुल आहे असे पुन्हा सांगितले. त्यामुळे आरोपींची कबुली स्वःखुशीने आहे असे दिसुन येते. तसेच आरोपीविरुध्द यापुर्वी अशा स्वरुपाचे कुठलेही गुन्हे असल्याबाबत तपासाधिकारी यांनी नमुद केलेले नाही.

आरोपी यास शिक्षेबाबत विचारले असता त्यांच्या घरातील आर्थीक परिस्थीती अत्यंत गरीबीची असल्यामुळे कमीत कमी दंड करावा अशी विनंती केली. आरोपीची आर्थीक परीस्थीती व त्याच्यावर असलेली जबाबदारी या दोन्ही गोष्टी लक्षात घेता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

# <u>आदेश</u>

१) आरोपी क्रं. १ ते ६ यांना महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ प्रमाणे गुन्हयासाठी कलम २५२ फौ. प्र. संहीतेनुसार दोषी धरण्यात येते.

२) आरोपी यांना महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ खालील गुन्हयासाठी दंड म्हणुन रोख रक्कम रुपये <u>३००/- (अक्षरी तिनशे रुपये मात्र) प्रत्येकी</u> भरावेत. तसेच आजचे न्यायालयीन कामकाज संपेपर्यत आरोपी यांना न्यायालयात उभे राहण्याची शिक्षा देण्यात येत आहे. दंडाची रक्कम न भरल्यास आरोपी यास दोन दिवस साध्या कारावसाची शिक्षा देण्यात येते.

३) सदर केसमध्ये पोलीसांनी केलेले जप्त मुद्देमाल रोख रक्कम एकुण ४६००/- रुपये हे अपील कालावधीनंतर सरकार जमा करण्यात यावे.

**4)** आरोपी यांनी इतर गुन्हयात आवश्यकता नसल्यास सोडुन देण्यात यावे. येणेप्रमाणे खुल्या न्यायालयात जाहीर.

PATIL NILESH BHASKAR

Order
Digitally signed by PATIL NILESH BHASKAR
Location: Nagpur
Date: 2026.03.18 12:49:52 +0530

दिनांक- १२/०३/२०२६

( निलेश बी. पाटील )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
न्यायालय क्रं. ३, नागपुर